# वसई विरार शहर महानगरपालिका
## प्रभाग समिती (बी), विद्युत विभाग
## निविदा सुचना क्र.०१(२०२२-२३)

वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) विद्युत विभागातील खालील अ.क्र ०१ ते १२ कामांकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत) यांच्याकडील नोंदणीकृत व अनुज्ञाप्राप्त विद्युत ठेकेदार यांच्याकडून **बी-१ नमुन्यात दोन लखोटा** पध्दतीनुसार महानगरपालिकच्या अटी व शर्तीस अधीन राहून मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहे. सदर कामाचे कोरे निविदा फॉर्म दि. २० /०५ /२०२२ पासुन ते दि.३० /०५ /२०२२ पर्यत सुटटीचे दिवसाखेरीज महापालिकेच्या कार्यालयीन कामकाजाचे वेळी रोखीने विकत मिळतील. सदर कामांची इसारा रक्कम आयुक्त वसई विरार शहर महानगरपालिका या नावे देय असलेल्या डिमांड ड्राफ्टद्वारे भरावी लागेल व सदर डिमांड ड्राफ्ट लखोटा क्र. १ सोबत जोडावा लागेल. डिमांड ड्राफ्टद्वारे इसारा न भरलेल्या , खाडाखोड करुन स्वाक्षांकित न केलेल्या, मुदतीत न आलेल्या व सर्शत निविदा नाकारण्यात येतील. सदर कामी पुर्णपणे भरलेल्या मोहरबंद निविदा दिनांक ३१ / ०५ /२०२२ पासून ते दि. ०२ / ०६/२०२२ पर्यत विद्युत विभाग प्रभाग समिती 'बी', नालासोपारा (प) यांच्या कार्यालयात ठेवलेले सिलबंद निविदा पेटीत टाकण्यात यावे. प्राप्त निविदा या सहा.आयुक्त, प्रभाग समिती ई कार्यालय, नालासोपारा (प) यांच्या दालनात हजर निविदाधारक अथवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी समक्ष त्याच दिवशी अथवा इतर सोयीच्या दिवशी उघडण्यात येतील.

| अ.क्र. | कामाचे नाव | अदांजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम रूपये | निविदा फॉम फी | सुरक्षा अनामत | कामाची मुदंत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग समिती "बी" हददीतील सर्वोदय वसाहत येथील माता बाळ संगोपन केंद्र मधील फार्मसी विभागात नविन वातानुकूलित यंत्रणा बसवून कार्यान्वित करणे. | ४९,५१६/- | ४९५/- | रू.२००/- +१८% GST २३६/- | मंजुर घटकाच्या दरानुसार होणाऱ्या अंदाजित रक्कमेवर २ % डि.डि. ने व २ % बिलातुन | १५ दिवस |
| २ | प्रभाग समिती "बी" हददीतील सर्वोदय वसाहत येथील माता बाळ संगोपन केंद्र मधील लॅबोरेटरी विभागात नविन वातानुकूलित यंत्रणा बसवून कार्यान्वित करणे. | ४९,५१६/- | ४९५/- | रू.२००/- +१८% GST २३६/- | मंजुर घटकाच्या दरानुसार होणाऱ्या अंदाजित रक्कमेवर २ % डि.डि. ने व २ % बिलातुन | १५ दिवस |
| ३ | प्रभाग समिती "बी" कार्यक्षेत्रातील सर्वे ११७ मधील तुळींज रुग्णालय मधील आ.सी.यु. विभागाकरिता वातानुकूलित यंत्रणा बसविणे. | २,५०,९१०/- | २,५०९/- | रू.२००/- +१८% GST २३६/- | मंजुर घटकाच्या दरानुसार होणाऱ्या अंदाजित रक्कमेवर २ % डि.डि. ने व २ % बिलातुन | १५ दिवस |
| ४ | प्रभाग समिती "बी" कार्यक्षेत्रातील उभारण्यात येणाऱ्या कोविड-१९ लसीकरण केंद्रात विद्युत व्यवस्था (फॅन, टयुबलाईट व पॉईट वासरिंग इ.) करणे. | ४,९८,१२३/- | ४,९८१/- | रू.५००/- +१८% GST ५९०/- | मंजुर घटकाच्या दरानुसार होणाऱ्या अंदाजित रक्कमेवर २ % डि.डि. ने व २ % बिलातुन | १५ दिवस |
| ५ | प्रभाग समिती "बी" प्रशासकिय ईमारतीकरीता ऑटो मेन्सफेल्युअर पॅनल बसविणे | १,७७,०३७/- | १,७७०/- | रू.२००/- +१८% GST २३६/- | मंजुर घटकाच्या दरानुसार होणाऱ्या अंदाजित रक्कमेवर २ % डि.डि. ने व २ % बिलातुन | १५ दिवस |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ६ | प्रभाग समिती "बी" कार्यक्षेत्रातील मोरेगाव नागरी सुविधा केंद्रासाठी विद्युत सुरक्षितेकरिता विद्युत पॅनल बसविणे. | २,९०,०३९/- | २,९००/- | रू.२००/- +१८% GST २३६/- | मंजुर घटकाच्या दरानुसार होणाऱ्या अंदाजित रक्कमेवर २ % डि.डि. ने व २ % बिलातुन | १५ दिवस |
| ७ | प्रभाग समिती "बी" कार्यक्षेत्रातील माता बाल संगोपन केंद्र सर्वोदय वसाहत मधील विद्युत सुरक्षितेकरीता विद्युत संच मांडणीमधील दोषांची पुर्तता करणे. | ४,९७,३८२/- | ४,९७४/- | रू.५००/- +१८% GST ५९०/- | मंजुर घटकाच्या दरानुसार होणाऱ्या अंदाजित रक्कमेवर २ % डि.डि. ने व २ % बिलातुन | १५ दिवस |
| ८ | प्रभाग समिती "बी" कार्यक्षेत्रातील तुळींज हॉस्पीटल मधील विद्युत सुरक्षितेकरिता विद्युत संच मांडणीमधील दोषांची पुर्तता करणे. | ४,८८,०८८/- | ४,८८१/- | रू.५००/- +१८% GST ५९०/- | मंजुर घटकाच्या दरानुसार होणाऱ्या अंदाजित रक्कमेवर २ % डि.डि. ने व २ % बिलातुन | १५ दिवस |
| ९ | प्रभाग समिती "बी" कार्यक्षेत्रातील तुळींज हॉस्पीटल मधील नादुरुस्त सिटी मिटर व फिडर पॅनल बदली करुन नविन बसविणे. | २,२८,१६५/- | २,२८२/- | रू.२००/- +१८% GST २३६/- | मंजुर घटकाच्या दरानुसार होणाऱ्या अंदाजित रक्कमेवर २ % डि.डि. ने व २ % बिलातुन | १५ दिवस |
| १० | प्रभाग समिती "बी" कार्यक्षेत्रातील माता बाल संगोपन केंद्र सर्वोदय वसाहत येथे मेडीकल स्टोअर रुम करिता वातानुकूलीत यंत्रणा बसविणे. | ३,२७,४५२/- | ३,२७५/- | रू.५००/- +१८% GST ५९०/- | मंजुर घटकाच्या दरानुसार होणाऱ्या अंदाजित रक्कमेवर २ % डि.डि. ने व २ % बिलातुन | १५ दिवस |
| ११ | वसई विरार शहर महानगरपालिका "बी" कार्यक्षेत्रातील सार्वजनिक शौचालयामध्ये विद्युतीकरण करणे. | ३,२९,४९६/- | ३,२९५/- | रू.५००/- +१८% GST ५९०/- | मंजुर घटकाच्या दरानुसार होणाऱ्या अंदाजित रक्कमेवर २ % डि.डि. ने व २ % बिलातुन | १५ दिवस |
| १२ | प्रभाग समिती "बी" कार्यालयातील यशवंतराव चव्हाण सभागृहातील नादुरुस्त वातानुकूलित यंत्रणा बदलवून नविन वातानुकूलित यंत्रणा बसविणे. | ४,९९,८३९/- | ४,९९५/- | रू.५००/- +१८% GST ५९०/- | मंजुर घटकाच्या दरानुसार होणाऱ्या अंदाजित रक्कमेवर २ % डि.डि. ने व २ % बिलातुन | १५ दिवस |

१) मॅन्युअल पध्दतीने फॉर्म खरेदीची अंतिम दि.३० / ०५ /२०२२ रोजी पर्यंत राहील.

२) कोरे निविदा फॉर्मची मागणी करतेवेळी अर्जा सोबत विद्युत विभागाच्या नोंदणी प्रमाणपत्राची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

३) ठेकेदाराने निविदा भरताना गुडस् ॲण्ड सर्विस टॅक्स (GST) चा विचार करुन निविदा दर भरावे. तसेच शासनाने वेळोवेळी लागू केलेले दर किंवा दर करार शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या धोरणाप्रमाणे सर्व समावेश करुन भरण्यात यावे.

४) ठेकेदारांनी निविदा भरताना दोन लिफाफा पध्दतीचा अवलंब करावे तसेच क्र. १ च्या लिफाफ्यात तांत्रिक बाबींचा कागदपत्रे **१) सा.बां.विभागाच्या योग्य वर्गातील नोंदणी प्रमाण पत्राची छायांकित प्रत २) १०० रु.स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र ३) गुडस् ॲण्ड सर्विस टॅक्स (GST) नोंदणी झेरॉक्स प्रत, ४) इसारा रक्कमेचे डिमांड ड्राफ्ट ५)** महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे शासन निर्णय क्र. सीएसटी/२०१८/प्र.क्र.१२७/इमा-२ दि.२८ नोव्हेंबर २०१८ अन्वयेच्या विहीत नमुन्यातील परिशिष्ट-१ नुसार यापुढे ३.०० लक्ष आतील स्थानिक व

३.०० वरील किमतीच्या ई-निविदेसोबत जोडलेली (अपलोड केलेली) सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र (परिशिष्ट-१) ५००/- रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर लिफाफा क्र.०१ मध्ये कंत्राटदारास **अपलोड करुन सर्व कागदपत्रे मनपा कार्यालयामध्ये देणे** बंधनकारक करण्यात येत आहे. व निविदेतील लिफाफा क्र.०१ मध्ये तसेच निविदा मंजूरी व नंतर देयक अदा करताना जोडलेली कागदपत्रे खोटी व बनावट असल्याची बाब निविदा उघडल्यानंतर निदर्शनास आल्यास त्यास कंत्राटदार पूर्णपणे जबाबदार राहील. सार्वजनिक बांधकामाचे अधिकारी त्यास जबाबदार असणार नाही.सदरची कागदपत्रे लिफाफा क्र. १ मध्ये नसल्यास संबंधित निविदाधारकास अपात्र ठरविण्यांत येईल व फक्त पात्र निविदाधारकांच्या स्पर्धात्मक निविदा बोलीचा लिफाफा क्र. २ उघडण्यात येईल.

५) कंत्राटदारानी व्दितीय लखोटयामध्ये बी - १ नमुन्यात दर भरण्यात यावे.

**६) लिफाफा क्र. २ च्या लिफाफा मध्ये अंदाजपत्रकिय रक्कमेपेक्षा कमी किंमतीच्या देकार सादर करणाऱ्या निविदाधारकांनी अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम १० लाखापर्यंतच्या कामाकरिता डी.डी. (Demand Draft) स्वरुपात व १० लाखावरील कामाकरिता बँक गॅरंटी स्वरुपात स्कॅन करुन अपलोड करणे आवश्यक आहे. अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम लागु नसल्यास निविदाकाराने कंपनीच्या लेटर हेडवर तसे प्रिंट करुन स्टँप व सही करुन देण्यात यावा.**

७) निविदेच्या इसारा रक्कमेध्ये कोणतीही सूट दिली जाणार नाही.

८) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्रमांक सीएटी/२०१७/प्र.क्र.०८/इमा-२, दि.२६ नोव्हेंबर २०१८ अन्वये अंदाजपत्रकिय रक्कमेपेक्षा कमी किंमतीच्या देकार सादर करणाऱ्या निविदाधारकांनी लिफाफा क्र.२ उघडल्यानंतर प्रथम न्युनतम देकार सादर करणाऱ्या L-१ निविदाकाराने Additional Performance Security Deposit चा डि.डि आठ दिवसांच्या आत याकार्यालयात जमा करावा. ही आठ दिवसांची मुदत कोणत्याही कारणं ासाठी शिथीलक्षम असणार नाही.

९) प्रथम न्युनतम देकाराच्या (L-१) निविदाकाराने वरील विहित मुदतीत Performance Security Deposit चा भरणा केली नाही तर व्दितीय न्युनतम देकाराच्या L-२ निविदाकारास लेखी विचारणा करण्यात येईल व L-२ निविदाकार L-१ पेक्षा कमी दराने काम करण्यास तयार असतील तर त्यांची निविदा मंजुर करण्यात येईल.

१०) प्राप्त निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा १०% पर्यंत कमी दरांचा असेल अशा ठेकेदारांनी निविदाधीन किंमतीच्या १% एवढ्या रक्कमेचा धनाकर्ष (Demand Draft) परफॉर्मन्स सिक्युरिटी म्हणून निविदेच्या लिफाफा क्र.२ मध्ये सादर करावा. (उदा.१% ते १०% कमी दर- १% रक्कम)

११) प्राप्त निम्नतम निविदेचा कामाच्या किंमतीपेक्षा १०% पेक्षा जास्त दराने कमी असेल दर देकार १०% पेक्षा जेवढ्या जास्त दराने कमी आहे. तेवढ्या रक्कमेचा व वरील बाब - ८ प्रमाणे येणाऱ्या रक्कमेसह एकत्रित धनाकर्ष (Demand Draft) निविदेसोबत लिफाफा क्र.२ मध्ये सादर करावा. (उदा.१४% कमी दर - १०% पर्यत करिता - १% टक्का व (१४% - १०%) - ४ असे एकूण ५%

१२) अंदाजपत्रकिय रक्कमेपेक्षा कमी किंमतीचा देकार असल्यास इसारा रक्कम बरोबर अतिरिक्त जमा करावा लागणारे परफॉर्मन्स सिक्युरिटी पुढील प्रमाणे :-
देकार १५% पेक्षा कमी दराचा असल्यास उर्वरित रक्कमेसाठी दोन पटीने रक्कम डी.डी.ने सादर करणे अनिवार्य राहील. (उदा.१९% कमी दरासाठी पुढील प्रमाणे पृथःकरण :-
१०% कमी दरापर्यंत १% व १५% कमी दरापर्यंत (१५%-१०%=५%) तसेच (१९%-१५%)=४% करिता (४%x२%=८%) असे एकुण (१%+५%+८%=१४%

१३) शासन परिपत्र १६/११/२०१८ नुसार परफॉर्मन्स सिक्युरिटीच्या डिपॉझीटचा धनाकर्ष (डी.डी) सिलबंद लिफाफा मधुन कन्ट्रक दराने लिफाफा क्र. १ व लिफाफा क्र. २ उघडल्यानंतर ८ दिवसांच्या आत विद्युत विभागात जमा करावा. लिफाफा वर कामाचे नाव व निविदा सुचना क्र. लिहिण्यात यावा. परफॉर्मन्स सिक्युरिटीच्या डिपॉझीटचा धनाकर्ष व्दितीय लखोटा उघडल्याचे दिनांकापासुन आठ दिवसांत सादर न केल्यास निविदा अपात्र ठरविण्यात येईल.

१४) निविदा उघडल्यानंतर लिफाफा क्र. १ मधील कागदपत्रांची पुर्तता न झाल्यास संबंधित कंत्राटदारांना त्यांच्या धनाकर्षाचे लिफाफे निविदा उघडल्याच्या दिनांकापासुन ८ दिवसांत परत करण्यात येईल.

१५) लिफाफा क. १ मधील कागदपत्रांची पुर्तता घेऊन ज्या कंत्राटदाराने लिफाफा क्र. २ चे मधील देकार उघडण्यात येतील त्यामधिल निम्मतम २ निविदाकारांचे धनाकर्ष लिफाफे वगळता इतर कंत्राटदाराचे धनाकर्ष लिफाफे ७ दिवसात परत करण्यात येतील.

१६) निम्नतम निविदाकारांना कार्यारंभ आदेश दिल्यानंतर ३ दिवसांत क्र. २ चे निम्नतम निविदाकाराचा धनाकर्ष परत करण्यात येईल.

१७) वरील पध्दतीमध्ये खोटी कागदपत्रे / धनाकर्ष सादर करणाऱ्या कंत्राटदारांची अनामत रक्कम (EMD) जप्त करण्यात येईल व संबंधित कंत्राटदाराला काळया यादीत सामाविष्ट करण्यात येईल. यासंबंधी मा.आयुक्त / मा.अति.आयुक्त / मा.शहर अभियंता यांना पुर्ण अधिकार राहतील.

१८) निविदा कामाबाबत तीनपेक्षा कमी निविदा प्राप्त झाल्यास फेरनिविदा मागविण्याचा तसेच कोणत्याही कारणाशिवाय निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखुन ठेवला आहे.

१९) काम समाधानकारक पुर्ण झाल्यावर प्राप्त परफॉर्मन्स सिक्युरिटी रक्कम कंत्राटदारास परत करण्यात येईल.

२०) धनाकर्ष उपलब्ध करुन देणे / धनाकर्ष परत करणे व इतर बाबींबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

- ❖ धनाकर्ष / बँक प्रतिपुर्ती हमी आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या नावे असावा.
- ❖ धनाकर्ष / बँक प्रतिपुर्ती हमी सरकारी बँक व शेडयुल बँकांकडुन काढलेला असावा.
- ❖ धनाकर्ष / बँक प्रतिपुर्ती हमीची मुदत कामाच्या दोष दायीत्व कालावधीनंतर एक महिना कालावधी पर्यंत असावी.
- ❖ धनाकर्षाची मुदत निविदा भरण्याच्या दिनांकानंतर किमान ३ महिने पर्यंत असावी.
- ❖ धनाकर्षावर बँकेचा MICR व IFSC कोड नंबर असणे आवश्यक आहे.
- ❖ धनाकर्षाची / बँक प्रतिपुर्ती हमी प्रत Scan करुन ई-निविदा भरताना ठेकेदारांनी अपलोड करावी. धनाकर्ष / बँक प्रतिपुर्ती हमी सिलबंद लिफाफ्यामधुन कंत्राटदारांनी निविदा स्विकृतीच्या दिनांकापर्यंत प्रभाग समिती (ई) विद्युत विभाग, कार्यालयात जमा करावा.

२१) मुदतीत प्राप्त झालेली निविदा दि. ०३ / ०६/२०२२ रोजी अथवा इतर सोयीच्या दिवशी उघडण्यात येतील.

२२) मॅन्युअल पध्दतीच्या निविदेमध्ये काही शंका असल्यास त्याचे निरसन प्रभाग समिती बी (विद्युत विभाग) कडून करुन घ्यावे.

२३) कोणतीही एक अथवा सर्व निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार मा.आयुक्त,वसई-विरार शहर महानगरपालिका यांनी राखुन ठेवला आहे.

जावक क्र. :वविशम/प्रसबी/विवि/२६८/२०२२-२३
दिनांक : १८ / ०५ /२०२२

उप- आयुक्त
परिमंडळ-१
वसई-विरार शहर महानगरपालिका